# वाकड पोलीस ठाणे,पिंपरी चिंचवड

पत्ता-२१०/१ कॅपीटल टॉवर शेजारी,दत्तमंदीर रोड, वाकड पुणे-५७
संपर्क - फोन- ०२०-२७२६११२०/३०
ईमेल- pswakad.pcpc-mh@gov.in


---

**प्रेसनोट** **दि. ०३/०५/२०२४**

## अपघाताचा बनाव करुन नियोजनबद्ध रित्या केलेल्या खुनाचा गुन्हा उघड सराईत गुन्हेगाराविरुध्द मोक्का अंतर्गत कारवाई, वाकड पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड यांची उल्लेखनिय कामगिरी.

---

दिनांक ०३/०३/२०२४ रोजी रात्री ०९:१५ वा दरम्यान वाकड काळा खडक येथे राहणारी महीला सौ. लता संतोषकुमार कांबळे वय ४५ वर्षे व तिचे पती श्री. संतोषकुमार कांबळे यांना पिकअप टेम्पोने जोरदार धडक दिल्याने सौ लता कांबळे यांचा मयत झाल्या होत्या तसेच त्यांचे पती हे गंभीर जखमी केले होते. सदर घटनेबाबत वाकड पोलीस ठाणेस अज्ञात टेम्पोचालका विरुध्द भादंवि कलम २०२४ भा.द.वि. कलम २७९,३३८,४२७,३०४(अ) मोटार वाहन अधिनयम कलम १८४, ११९, १७७, १३२(१)(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर प्रकार हा अपघाताचा नसुन घातपाताचा संशय असल्याबाबतची माहीती मिळुन येत होती. मा. श्री. बापु बांगर पोलीस उप आयुक्त परि-२, पिंपरी चिंचवड, श्री. डॉ. विशाल हिरे, सहा. पोलीस आयुक्त, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांनी लक्ष घालुन गुन्हयातील अज्ञात टेम्पो व टेम्पाचालकाचा शोध घेऊन पुढील कार्यवाही करणेबाबत वाकड पोलीस ठाणेस सुचना दिल्या होत्या त्याप्रमाणे श्री. निवृत्ती कोल्हटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलीस ठाणे यांनी तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना या घटनेबाबत परीसरातील सी.सी.टी.व्ही., प्रत्यक्ष साक्षीदार,तसेच गोपनीय बातमीदारांमार्फत माहीती प्राप्त करुन तपास करण्याबाबत सांगितले.

वाकड पोलीस ठाणेचे, श्री. विठ्ठल साळुंखे, पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली वाकड पोलीस ठाण्याचे तपास पथकाचे पोउनि. सचिन चव्हाण, पोउनि. अनिरुध्द सावर्डे, गुन्हयाचे तपासी अधिकारी पोउनि. नागनाथ सुर्यवंशी व तपास पथकातील अंमलदार यांनी गुन्हयातील अज्ञात आरोपी व अज्ञात पिकअप टेम्पोचा शोध घेण्याकामी घटनास्थळाचे आजुबाजुचे, घटनास्थळावरे येण्या जाण्याचे मार्गावरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. सीसीटीव्ही पाहणी व तपासादरम्यान असे निदर्शनात आले की, अपघाताचे घटनेपुर्वी तीन ते साडेतीन तास अगोदर घटनास्थळाचे परिसरात एक पिकअप टेम्पो नं. एमएच १२ युएम ३८६३ हा संशयीतरित्या फिरत असल्याचे दिसुन आला. टेम्पोचे पाठीमागील व पुढील नंबर प्लेटवर नंबर अदृष्य करण्याचे हेतुने काहीतरी लावल्याचे दिसुन आले. नमुद टेम्पोचा चालक यांच्यासह गुन्हयातील आरोपी संशयास्पद हालचाली करीत असुन मयत महीला व तिचे पती येण्याचे मार्गावर आरोपी टेम्पोसह थांबलेले आढळुन आले. मयत महीला व तिचे पती हे तेथुन पायी येत असल्याचे दिसताच टेम्पोने त्यांना भरदाव वेगाने धडक देवुन महीला व तिचे पती यांना गंभीर जखमी करुन पळुन गेल्याचे सी.सी.टी.व्ही फुटेजच्या निरीक्षणामध्ये निष्पन्न झाले.

सदरचा गुन्हा हा अतिशय नियोजनबद्ध रित्या व कट केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने गुन्हयामध्ये भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, १२० ब, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे कलमवाढ

करण्यात आली. गुन्हयाचे तपासामध्ये टेम्पोविषयी माहीती घेऊन त्यावरील चालक हा १. **रोहीत नागनाथ गायकवाड वय २३ वर्षे रा. शिव चैतन्य कॉलनी, शेवाळवाडी, शेवाळे चौक, हडपसर पुणे** याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेऊन त्याकड तपास केला असता सदरचा गुन्हा हा त्याने अभिलेखावरील सराइत गुन्हेगार २. **आनंद किशोर वाल्मिकी, वय २९ वर्षे, रा.काळाखडक झोपडपट्टी,वाकड, पुणे ३. परशुराम / परश्या सुनिल माने वय२४ वर्षे रा. काळाखडक झोपडपट्टी,वाकड, पुणे** यांच्या सह केल्याचे माहीती दिल्याने त्यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे **कौशल्यपुर्वक तपास केला असता त्यांनी सदरचा गुन्हा अपघात नसुन अपघाताचा बनाव करुन महीला लता संतोषकुमार कांबळे यांचे सोबत असलेल्या पुर्वीच्या वादाच्या कारणावरुन तिला जीवे मारण्याचे उद्देशाने कट करुन तिचे जाण्यायेण्याच्या मार्गावर पाळत ठेवुन दिनांक ०३/०३/२०२४ रोजी ती तिच्या पतीसह स्वर्ण हॉस्पीटल जवळ, काळाखडक,वाकड येथुन पायी चालत येत असताना आरोपींनी टेम्पोने जोरदार धडक देऊन उडवुन तिला ठार मारुन तिचे पतींना गंभीर जखमी केल्याबाबतची कबुली दिली. नमुद आरोपींना गुन्हयात दिनांक १२/०३/२०२४ रोजी अटक करुन त्यांची पोलीस कस्टडी रिमांड घेवुन तपास करता गुन्हयामध्ये पाळत ठेवण्यासाठी त्यांनी एका विधी संघर्षित बालकाचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने** त्यास ताब्यात घेऊन बालन्यायमंडळासमोर हजर केले आहे.तसेच सदरचा गुन्हा हा अटक आरोपी यांचा साथीदार **पाहीजे आरोपी शाहरुख युनुस खान रा. काळाखडक झोपडपट्टी,वाकड, पुणे** याच्या सह कट करुन केल्याचे निष्पण्ण झाले आहे.

दाखल गुन्हयातील आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड व नमुद गुन्हयातील सहभाग यावरुन नमुद आरोपी हे संघटीतपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक ३०/०४/२०२४ मा. अपर पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांची पुर्वमान्यता घेऊन दाखल गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(i) (ii), ३(२), ३(४) चा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास श्री. डॉ. विशाल हिरे, सहा. पोलीस आयुक्त वाकड विभाग, हे करीत आहेत.

आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभुमी खालीलप्रमाणे —

**१. पाहीजे आरोपी (टोळी प्रमुख)शाहरुख खान याचे गुन्हे अभिलेख -**

| अ.नं. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | हिंजवडी | २२२/२०१४ | भादवि.क. १४३,१४७,१४९,३२४,४२७,५०४. |
| २ | हिंजवडी | ४१९/२०१४ | भादवि.क. १४३,१४४,१४७,१४८,१४९,३२३,३२४,५०४,५०६, ४२७ आर्म ॲक्ट ४(२५). |
| ३ | वाकड | ७९/२०१५ | भादवि.क. ३२६,३२४,५०४,५०६,३४. |
| ४ | खडकी | ६८/२०१५ | भादवि.क. ३९५. |
| ५ | वाकड | ३२५/२०१५ | भादवि.क. ३२४,३२३,५०४,३४. |
| ६ | वाकड | ५११/२०१५ | भादवि.क. ३०७,१४३,१४४,१४७,१४८,१४९. |
| ७ | वाकड | ७११/२०१७ | भादवि. ३२६,३२३,५०४,१४३,१४४,१४७,१४८,१४९,मपोॲ.३७(१) |
| ८ | वाकड | २०४/२०१८ | आर्म ॲक्ट ४(२५) म.पो.ॲ. ३७(१) सह १३५. |
| ९ | पिंपरी | ३३०/२०१८ | भादवि. ३०७,१४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६,आर्म ॲक्ट ३,४(२५).क्रि.लॉ.अ.ॲ.३व ७,मपोॲ.३७(१),१३५. |
| १० | वाकड | १२१२/२०१९ | भादवि. ३६३,३२४,१४३,१४७,१४९,५०६,५०४. |
| ११ | वाकड | ३५८/२०२१ | भादवि. ३७९, ५११, ३४. |
| १२ | वाकड | ९५४/२०२१ | भादवि.१८८,२६९,२७०,३४ साथीचा रोग अधि.१८९७ क. ३, मपोका.३७(१)(३), राष्ट्रीय आपत्ती अधि.२००५ चे क. ५१(ब) महा.कोवीड १९ उपाय योजना २०२० चे क. ११ |
| १३ | वाकड | ९९४/२०२१ | महा.जुगार कायदा कलम १२(अ) |
| १४ | वाकड | ९५५/२०२२ | भादवि. १८८, म.पो.अ. ३७(१)(३) |
| १५ | वाकड | १९५/२०२३ | भादवि. ३९५, ३२३, मपोका.(१)(३) सह १३५,क्रिमिनल लॉ अमेडमेंट ॲक्ट क ३,७. मोका |

### २. आरोपी - आनंद किशोर वाल्मिकी, याचे गुन्हे अभिलेख -

| अ.क्र. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाकड | १९५/२०२३ | भादवि. ३९५, ३२३, मपोका. (१)(३) सह १३५, क्रिमिनल लॉ अमेडमेंट ॲक्ट कलम ३, ७. मोका. |
| २ | वाकड | ९९४/२०२१ | महा. जुगार का. क. १२(अ) |
| ३ | वाकड | १९८/२०२१ | महा. जुगार का. क. १२(अ) |
| ४ | हिंजवडी | ७२४/२०१९ | भादवि.३९५,३६४,५०६,आर्म ॲक्ट ३(२५), मपोका. ३७(१)(३), १३५. |

### ३. आरोपी - परशुराम / परश्या सुनिल माने, याचे गुन्हे अभिलेख -

| अ.क्र. | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|
| १ | ३६५/२०२१ | भादवि. ३२४, ३२३, ५०४, ३४. |
| २ | ३८५/२०१५ | भादवि. ३२६, ३४. |
| ३ | ०५/२०१९ | भादवि. ३२४, ३२३, ५०४, ३४. |
| ४ | ८२६/२०१९ | भादवि. ३९५, ३९७, मोका. क.३(१)(ii), ३(४). |

### ४. आरोपी - रोहित नागनाथ गायकवाड, याचे  गुन्हे अभिलेख -

| अ.क्र. | पो.स्टे. | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १ | चतुःश्रृंगी | १४३८/२०२२ | आर्म ॲक्ट ४(२५) मपोका. ३७(१)(३), १३५. |
| २ | वाकड | ३६५/२०२ | भादवि. ३२४,३२३, ५०४,३४ |
| ३ | सिहंगड रोड | २५०५/२०२० | भादवि. ३२४,३२३, ५०४,३४ |

सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त परि-२, श्री. बापु बांगर, सहा. पोलीस आयुक्त वाकड विभाग, श्री. डॉ. विशाल हिरे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. निवृत्ती कोल्हटकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुन्हे विठ्ठल साळुंखे, पोलीस निरीक्षक गुन्हे, रविकिरण नाळे, तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक सचिन चव्हाण, पोउनि. अनिरुध्द सावर्डे, पोउनि. नागनाथ सुर्यवंशी, श्रेणी पोउपनि. बिभीषण कन्हेरकर, श्रेणी पोउपनि. बाबाजान इनामदार, सपोफौ. राजेंद्र काळे, पोलीस अंमलदार वंदु गिरे, प्रमोद कदम, स्वप्निल खेतले, संदीप गवारी, अतिश जाधव, दिपक साबळे, अतिक शेख, विक्रांत चव्हाण, प्रशांत गिलबीले, कौतेंय खराडे, रामचंद्र तळपे, विनायक घारगे, भास्कर भारती, अजय फल्ले, सौदागर लामतुरे, स्वप्निल लोखंडे, रमेश खेडकर, ज्ञानदेव झेंडे,सागर पंडीत (परि-०२ कार्यालय) यांनी मिळुन केली आहे.

(बापु बांगर)
पोलीस उप आयुक्त
परि-२, पिंपरी चिंचवड आयुक्तालय

***********